# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/३०० /२०२५-२६** **दिनांकः २५/०६/२०२५**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याची प्रत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

**जा.क्र./मनपा/उद्यान/मिरारोड/३०० /२०२५-२६** **दिनांकः २५/०६/२०२५**

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊनअधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, प्रत्यक्ष पाहणी केली असता झाडे काढणे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | ठिकाण | वृक्षाचे नाव | अदांजे वय | संख्या | मुळासहित काढणे/ पुर्न:रोपण करणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्र पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजना टप्पा-२ (भाग-२) या योजने अंतर्गत मलनि:सारण केंद्र क्र. २ येथे प्रस्तावीत मलनि:सारण केंद्राच्या (भाईंदर (प.) अमृतवाणी संत्सग रोड, आरक्षण क्र. ९३ उद्यानाच्या) जागेतील झाडे बाधित होत असुन मुळासहित काढणे आवश्यक आहे. **मा. शहर अभियंता यांनी ०८/०५/२०२५ रोजी दिलेले निर्देश.** | **सविस्तर तपशील माहापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेला आहे.** | **सविस्तर तपशील माहापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेला आहे.** | ६४ | **मुळासहित काढणे** | विकास कामात बाधित |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी पंपिंग स्टेशन मधुन उत्तन गावासाठी होणारा पाणी पुरवठ्याची जलवाहिनी जात असून सदरची झाडे जलवाहिनीवर कोसळयाची शक्यता नाकारता येत नाही यास्तव नमुद ०२ झाडे धोकादायक असून मुळासहित काढणे आवश्यक आहे. **मा. शहर अभियंता (साबा.) यांचे दि.१६/०६/२०२५ रोजीचे पत्र.** | निलगिरी | २१ वर्ष | १ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| | | गुलमोहर | १६ वर्ष | १ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| ३ | मिरा रोड (पु) सर्वे नं ६, हिस्सा न १, जरी मरी तलाव जवळ, काशि, काशिमिरा येथिल मानसी क्लासीक को.ऑ.हौ.सो लि. येथील ०२ नग गुलमोहर झाडे असून सदरची दोन्ही झाडे एकाबाजुस झुकलेली असुन जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **(मानसी क्लासीक को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२३/०६/२०२५ रोजीचे पत्र)** | गुलमोहर | ११ वर्ष | ०१ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| | | गुलमोहर | १६ वर्ष | ०१ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| ४ | मिरा रोड (पु) सेक्टर नं ०५, बिल्डींग नं बी-२८/२९, शांतीनगर येथील द मधुकर शांतीनगर को.ऑ.हौ.सो लि. येथील ०१ नग पेल्ट्रोफॉम झाड आहे. सदर झाडाचे खोड कुजले असुन झाडाच्या बुध्यातुन खराब झाले आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **द मधुकर शांतीनगर को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.०५/०५/२०२५ रोजीचे पत्र** | पेल्ट्रोफॉम | २६ वर्ष | ०१ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| ५ | मिरा रोड (पु) रावल नगर, न्यु पोस्ट ऑफिस, येथे रावल इंटरनॉशनल स्कुल आवारात ०१ नग नारळ झाड आहे. सदर झाडाचे एकाबाजुने कुजले असुन झाडाच्या बुध्यातुन खराब झाले आहे आणि हे झाड कॉलेजच्या दिशेने झुकले आहे. कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांचा वरदळ असते. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **रावल इंटरनॉशनल स्कुल यांचे दि.०९/०६/२०२५ रोजीचे पत्र..** | नारळ | ११ वर्ष | ०१ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | मिरा रोड (पु) गोल्डन नेस्ट ५, मिरा भाईंदर रोड येथिल सोनम सफायर को.ऑ.हौ.सो लि. येथील ०१ नग आकेशियाचे झाड असून सदर झाडाचे खोडाला किड लागुन झाड कुजले असुन झाडाच्या बुध्यातुन खराब झाले आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **गोल्डन नेस्ट -५, सोनम सफायर को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२६/०५/२०२५ रोजीचे पत्र..** | आकेशिया | २१ वर्ष | ०१ | **मुळासहित काढणे** | धोकादायक झाडे |
| ७ | भाईंदर (प.) डोंगरी चौक, उत्तन, येथिल ज्युलेस झुल्या पाटील यांच्या घराच्या आवारात ०१ नग जांभळाचे झाड उंच वाढ़लेले असून सदरचे झाड घराचे पायाचे खोदकाम करताना झाड धोकादायक झालेले आहे. तसेच झाडाची मुळ जमिनीच्या बाहेर आलेली आहे. जोराच्या वा-या पावसाने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या झाडाची उंची पाहता सदरचे झाड पुर्नरोपण करणे शक्य नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(ज्युलेस झुल्या पाटील यांचे दि.१६/०५/२०२५ रोजीचे पत्र)** | जांभूळ | १६ वर्ष | ०१ | | |
| ८ | मिरा रोड (पु) नयानगर, एन.एच इगलिंश स्कुल येथील ०३ नग झाडे शाळेच्या आवारात असून सदरची झाडे झुकुन संरक्षण भिंतीवर टेकली आहेत व मुळे जमिनीवर आली आहेत. सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा वरदळ जास्त प्रमाणात असते. तरी जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाडे संरक्षण भिंतीवर पडून तसेच येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **द सुलतान खान एज्युकेशन ट्रस्ट यांचे दि.२९/०५/२०२५ रोजीचे पत्र** | गुलमोहर | २१ वर्ष | ०१ | | |
| | | गुलमोहर | २६ वर्ष | ०१ | | |
| | | नारळ | १६ वर्ष | ०१ | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे dc1garden@mbmc.gov.in किंवा garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**